<u>**पुढील सरतपास वादीतर्फे वकील श्री.एस.एन.भणगे यांचे मार्फत शपथेवर सुरु–**</u>

**१०.** मी दाव्याच्याकामी निशाणी ४/१ येथे दि. १९/०४/२०१७ रोजी प्रतिवादीस दिलेल्या नोटिशीची स्थळप्रत दाखल केली आहे. (साक्षीदाराला नोटिशीची स्थळप्रत दाखविण्यात आली.) ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व माझे विधीज्ञ यांची सही आहे. **(नोटीशीच्या स्थळप्रतीला <u>निशाणी ४३</u> देण्यात येते.)** मी दाव्याच्याकामी निशाणी ४/२ येथे प्रतिवादी यास नोटीस पोहोचल्याची पोस्टाची पोहोच पावती दाखल केली आहे. ती तीच आहे. त्यावर प्रतिवादी याची सही असून त्यावर पोस्टाचा शिक्का आहे. **(पोस्टाच्या पावतीस <u>निशाणी ४४</u> देण्यात येते.)** मी दाव्याच्याकामी निशाणी ४/३ येथे माझ्या नोटिशीला प्रतिवादीने दिलेल्या उत्तराची प्रत दाखल केली आहे. त्यावर प्रतिवादीची व त्याचे विधीज्ञ यांची सही आहे. त्यातील मजकूर मला मान्य नाही. **(सदर नोटीस उत्तराला <u>निशाणी ४५</u> देण्यात येते.)** मी दाव्याच्याकामी निशाणी ४/४ येथे प्रतिवादीच्या उत्तरास मी दि. २८/०५/२०१७ रोजी प्रतिवादीस प्रतिउत्तर पाठविले. त्याची स्थळप्रत दाखल केली आहे. त्यावर माझी व माझे विधीज्ञ यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदर प्रतिउत्तराला <u>निशाणी ४६</u> देण्यात येते.)** मी दाव्याच्याकामी निशाणी ४/५ येथे मी दिलेले प्रतिउत्तर प्रतिवादीला पोहोचलेबाबतची पोस्टाची पोहोच पावती दाखल केलेली आहे. त्यावर प्रतिवादी यांची सही असून त्यावर पोस्टाचा शिक्का आहे. **(पोस्टाच्या पोहोच पावतीस <u>निशाणी ४७</u> देण्यात येते.)**

<u>**पुढील सरतपास पूर्ण.**</u>

**( प्रतिवादी हजर व त्यांचे विधीज्ञ गैरहजर. उलटतपास घेण्यासाठी त्यांना एक संधी देण्यात येते. सबब, प्रतिवादीतर्फे वादीचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.)**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
(के.के.पाटील)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.

दिनांक– १५/१०/२०२२.